
सायंदैनिक

# गुड इव्हिनिंग City

goodeveningcity@gmail.com

८ जून २०२५, रविवार | वर्ष १४ वे | अंक ६० | पृष्ठे ६ | किंमत ३ रू.


## कोलंबियाच्या राष्ट्रपती पदाच्या उमेदवारावर गोळीबार, प्रकृती गंभीर

**नवी दिल्ली, ८ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : दक्षिण अमेरिकन देश कोलंबियामध्ये, राष्ट्रपती पदाचे उमेदवार मिगुएल उरीबे यांच्यावर निवडणूक प्रचारादरम्यान गोळीबार करण्यात आला. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती अजूनही गंभीर आहे. ही घटना स्थानिक वेळेनुसार शनिवारी संध्याकाळी घडली.

उरीबे राजधानी बोगोटा येथे एका रॅलीला संबोधित करत होते. कोलंबियामध्ये २०२६ मध्ये राष्ट्रपतीपदाच्या निवडणुका होणार आहेत. मिगुएल उरीबे हे अध्यक्षपदाचे प्रमुख दावेदार मानले जातात. ३९ वर्षीय उरीबे हे विरोधी सेंट्रो डेमोक्रॅटिको कंझर्व्हेटिव्ह पक्षाचे सदस्य आहेत.

पक्षाने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की हल्लेखोराने उरीबे यांच्या पाठीत गोळी झाडली जेव्हा ते भाषण देत होते. बोगोटाचे महापौर कार्लोस गॅलन म्हणाले की, हा हल्ला शहरातील फोंटिबोन भागात झाला. उरीबे यांच्या प्रकृती लक्षात घेता शहरातील रुग्णालयांना सतर्कतेचा



इशारा देण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून आरोपी हल्लेखोराला अटक केली आहे. उरीबे हे प्रसिद्ध कोलंबियन पत्रकार डायना टर्बे यांचे पुत्र आहेत, ज्यांचे १९९१ मध्ये ड्रग माफिया पाब्लो एस्कोबारच्या मेडेलिन कार्टेलने बोगोटा येथे अपहरण केले होते.

डायना त्या काळातील एक मोठ्या पत्रकार होत्या, सतत ड्रग्ज तस्करी आणि संघटित गुन्हेगारीविरुद्ध लिहित होत्या. बचाव मोहिमेदरम्यान आपला जीव गमवावा लागला. मिगुएल उरीबे हे लहानपणापासूनच राजकारणात सहभागी आहेत. ते माजी राष्ट्रपती ज्युलिओ सेसर तुर्बे यांचे नातू आहेत. ज्युलिओ सेसर तुर्बे हे १९७८ ते १९८२ पर्यंत कोलंबियाचे २५ वे राष्ट्रपती होते.

ते कोलंबियन लिबरल पक्षाचे एक प्रमुख नेते होते. त्यांची राजकीय विचारसरणी उदारमतवादी होती आणि ते सामाजिक सुधारणांना प्राधान्य देत होते, परंतु त्यांच्या रूढीवादी धोरणांमुळे ते वादग्रस्त बनले. माजी राष्ट्राध्यक्ष ज्युलिओ सीझर टर्बे आणि त्यांची पत्नी न्याडिया क्विंटरो टर्बे. गोळीबारानंतर, उरीबे आणि त्यांचे समर्थक घटनास्थळी रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. उरीबेवर गोळीबार करणाऱ्या हल्लेखोराला घटनास्थळी अटक करण्यात आली.


पैनगंगा अर्बन
को. ऑप. क्रेडिट सोसायटी मर्या. बुलडाणा
रजि. नं.४२२
मुख्य कार्यालय : D.S.D. सिटी मॉल,दु.नं.१०३-१०४, बुलढाणा ४४३००१ (महा.) संपर्क: ९४२३७२२१२०

संस्थेचे मुख्यालय येथे खालील पदे भरणे आहे.

पाहिजेत

| अ.क्र | पदनाम | शैक्षणिक अर्हता | संख्या |
|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापक | पदवीधर १ वर्षाचा अनुभव संगणकाचे ज्ञान आवश्यक | १ |
| २ | लिपिक/कॅशिअर | पदवीधर संगणकाचे ज्ञान आवश्यक | ३ |
| ३ | शिपाई | १० वी/ १२वी | १ |
| ४ | अल्प बचत प्रतिनिधी | १० वी/ १२वी | ५ |

भेटण्याची वेळ : ११ ते ३ पर्यंत
संपर्क : DSD सिटी मॉल गाळा क्र.१०३,१०४ बुलढाणा
९४२३७२२१२० / ९९२१४३९५३१
इच्छुक उमेदवारांनी आपला बायोडाटा/ शैक्षणिक कागदपत्रे, पासपोर्ट फोटो सहित संस्थेचे मुख्यालय येथे भेट द्यावी


## डॉ.दत्तात्रय बिराजदार जिल्हा शल्य चिकित्सक पदाचा उद्या स्विकारणार पदभार

**बुलढाणा, ८ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : जिल्ह्याचे खासदार हे केंद्रात आरोग्य राज्यमंत्री असतांना सुध्दा जिल्ह्याला पूर्णवेळ जिल्हा शल्य चिकित्सक नव्हते. केंद्रिय आरोग्य राज्यमंत्रीपदाची शपथ घेवून तब्बल वर्ष उलटले तरी जिल्ह्याला पूर्णवेळ सीएस पद भरण्यात आले नव्हते. पण काल त्यासंदर्भात आदेश निघाले आहे. जिल्हा सामान्य रूग्णालयातील डॉक्टरावर वचक नाही, रूग्णांसाठी सुख-सुविधा देण्यास कमी पडलेले तसेच विविध प्रकारच्या तक्रारी वाढल्यामुळे डॉ. भागवत भुसारी यांचा जिल्हा शल्य चिकित्सक पदाचा प्रभार काढण्यात आला असून डॉ. दत्तात्रय बिराजदार यांच्या रूपाने जिल्ह्याला पूर्णवेळ जिल्हा शल्य चिकित्सक मिळाले आहेत.

तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुभाष चव्हाण यांचा पदभार ५ जून २०२४ रोजी काढण्यात येऊन डॉ. भागवत भुसारी यांच्याकडे प्रभार देण्यात आला होता. त्यांच्या नियुक्तीला ५ जून २०२५ रोजी एक वर्ष पूर्ण झाले होते. त्यांना बुलढाणा जिल्हा शल्य चिकित्सक पदाचा पूर्णवेळ पदभार मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, त्यांचा रूग्णालयातील डॉक्टरावर कोणत्याच प्रकारचा वचक नसल्यामुळे अनेक डॉक्टर रूग्णालयात उशिरा येत होते. याशिवाय अनेक रूग्णांना अत्यावश्यक सुविधा मिळाल्या नाहीत. अनेक रूग्णांची गैरसोय झाल्यामुळे वरिष्ठांकडे तक्रारी वाढल्यामुळे डॉ. भुसारी यांचा जिल्हा शल्य चिकित्सक पदाचा प्रभार काढण्यात आला आहे. तर शासनाच्या एका आदेशान्वये ६ जून २०२५ रोजी बुलढाणा जिल्ह्याला पूर्ण वेळ शल्य चिकित्सक मिळाले आहेत. लातूर जिल्ह्यातील बाभळगाव ग्रामीण रूग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांची बुलढाण्यात बदली करण्यात आली आहे. डॉ.बिराजदार हे सोमवार दिनांक ९ जून रोजी बुलढाणा जिल्हा शल्य चिकित्सक पदाचा पदभार स्विकारणार आहे.



डॉ.भागवत भुसारी यांनी जिल्हा शल्य चिकित्सक असतांना जिल्हा सामान्य रूग्णालयाची घडी बसविण्याची काम केले. त्यांना यामध्ये काही प्रमाणात यश ही आले. त्यांच्या कामाबद्दल अनेकांनी समाधानकारक प्रतिक्रिया दिल्या आहे.

शेगाव व त्यालगतच्या तालुक्यात झालेले टक्कल व्हायरस किंवा नख कत्रण्याचे व्हायरस हे दोन व्हायरसने जिल्ह्यातील काही तालुक्यात थैमान घातले होते. त्यावेळी जिल्ह्याला पूर्ण वेळ जिल्हा शल्य चिकित्सक नेमल्या जाण्याची अपेक्षा होती. आता डॉ.दत्तात्रय बिराज हे या प्रकरणाला कशा पध्दतीने हातळतात हे त्यांच्या कालावधीत समोर येईल. जिल्हा सामन्य रूग्णालया बाबत अनेक वेळेला आंदोलन, उपोषण व निवेदन हे प्रकार सुरूच असतात. त्यामुळे डॉ.बिराजदार किती गांभीर्याने हे विषय हातळतात ते बघावे लागेल.

## कर्जमुक्ती व पिकविम्यासाठी तुपकरांचे संतनगरीत १० जूनला शेतकऱ्यांचा एल्गार



**बुलढाणा, ८ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती तसेच ज्या शेतकऱ्यांना अद्याप पिक विमा मिळालेला नाही त्या शेतकऱ्यांना त्वरित पीक विमा देण्यात यावा या दोन प्रमुख मागण्यांसह शेतकरी, कष्टकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी संतनगरी शेगाव येथे शेतकऱ्यांचा एल्गार आयोजित करण्यात आला आहे. १० जून रोजी संत गजानन महाराज यांचे दर्शन घेऊन शेतकरी नेते रविकांत तुपकर शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती व शेतकऱ्यांच्या इतर मागण्यांसाठी एल्गार पुकारणार आहेत. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या मेळाव्याला उपस्थित राहावे असे आवाहन क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांकडे राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी राज्यभर एल्गार पुकारला आहे. संपूर्ण कर्जमाफी तसेच शेतकऱ्यांचा हक्काचा पिकविमा तातडीने त्यांच्या खात्यात जमा करावा, अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेती पिकांचे नुकसान भरपाई तातडीने द्यावी, सक्तीची कर्ज वसुली तातडीने थांबवावी,पिकांचे जंगली जनावरांपासून रक्षण करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना राबवाव्या, सोयाबीनला आठ ते दहा आणि कापसाला १२ ते १४ हजार रुपये भाव मिळावा, या सह विविध मागण्यांसाठी शेतकऱ्यांचे नेते रविकांत तुपकर यांनी राज्यभर दौरे सुरू केले आहेत. नाशिक, निफाड, सिन्नर, संगमनेर, अहिल्यानगर, शिक्रापूर, शिरूर, कर्जत,जामखेड,पंढरपूर, कोल्हापूर, सांगली, धाराशिव, नांदेड, परभणी, लातूर, बीड आदी जिल्ह्यांमध्ये दौरा करून रविकांत तुपकर यांनी २७ मे रोजी सिंदखेड राजा येथे आयोजित एल्गार मेळाव्यात सरकारच्या विरोधात तफ डागली. त्यानंतर आता १० जून रोजी विदर्भ पंढरी, संतनगरी शेगाव येथे एल्गार सभा आयोजित करण्यात आली आहे. अग्रसेन चौकातील माहेश्वरी भवन येथे सकाळी ११ वाजता ही सभा होणार आहे. संपूर्ण कर्जमुक्तीसाठी व ज्या शेतकऱ्यांना पीकविमा मिळाला नाही 'त्या' शेतकऱ्यांनी आपल्या पावत्या घेऊन शेगाव येथे जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे,असे आवाहन क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.



# लोणचे बनवण्याची घरोघरी लगबग!

## बाजारातून लोणच्याचे साहित्य खरेदीला वेग

**बुलढाणा, ८ जून (गुड इव्हिनिंग सिटी) :** कडक उन्हामुळे शेवया, कुरडया, खारुड्या तयार करण्याची लगबग झाली. त्यानंतर अचानक पावसाने हजेरी लावली. हवामानात गारवा आला. याचा फायदा घेत ग्रामीण भागात घराघरात लोणचं तयार करण्यास सुरुवात झाली.

घरोघरी लोणचे बनवण्यासाठी लागणाऱ्या खाराचा घमघमाट सुटला असून अवकाळी पावसाच्या भीतीने आंबा बागायतदारांनी आंबे बाजारात आणल्याने सध्या बाजारात कैरीची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. बाजारातून लोणच्याचे साहित्य खरेदीला वेग आला आहे. लवंग, मिरे, बडीशोप, मोहरीची डाळ यासह प्रसिद्ध कंपन्यांच्या लोणच्याच्या पुड्यांची मागणी वाढली आहे. जेवताना ताटात रसरशीत लोणचं हवे असते. त्यामुळे घरगुती लोणच्याला पसंती मिळते. बाजारात विविध कंपन्यांची लोणच्याची बरणी उपलब्ध आहे. पण घरचे लोणचं चवदार लागते, हे निश्चित. लोणच्यासाठी लागणाऱ्या मिरची, तेल, मसाल्यांचे दर थोडे वाढले आहेत. बाजारातून खात्रीशीर आंबा मिळाल्यावर कैऱ्या फोडून लोणचे तयार केले जाते. हे लोणचं मातीच्या किंवा चिनी मातीच्या भांड्यात ठेवले जाते. त्यामुळे १५ ते २० दिवसांनी ते अधिक चवदार होते. ग्रामीण भागात घरगुती लोणच्याला प्राधान्य आहे. रेडिमेड लोणच्याला चव नसते. त्यात सायट्रिक सिड जास्त असते. त्यामुळे सूक्ष्मजंतूंपासून संरक्षण मिळते, पण चव कमी होते. घरगुती लोणचे १०० टक्के शुद्ध आणि चविष्ट असते. हेच लोणचे नात्यात दिले जाते. त्यामुळे आपुलकी वाढते. जेवताना हे लोणचं चवीने मागवले जाते. लोणच्यासाठी लागणारी गावरान कैरी ४० ते ६० रुपये किलो दराने मिळते. ही कैरी शेतकऱ्यांकडूनच घेतली जाते. ती मिळेपर्यंत लोणचं केले जात नाही. लंगडी, मारुती, खोबऱ्या, तोतापरी या स्थानिक कैऱ्यांना गृहिणींची पसंती असते. कैरी टणक आणि कडक असावी. नरम कैरी वापरली जात नाही.



कैरी फोडण्यासाठी २० रुपये मोजावे लागतात लोणच्याचा मसाला तयार झाल्यावर कैरी फोडणाऱ्याची गरज भासते. एक किलो कैरी फोडण्यासाठी १० ते २० रुपये मोजावे लागतात. फोडलेली कैरी रात्रभर फडक्यात बांधून ठेवली जाते. त्यामुळे तिचा आंबटपणा कमी होतो. अशा प्रकारे तयार झालेले लोणचं अधिक चवदार लागते. मराठमोळ्या जेवणाच्या ताटात आंबट-गोड-तिखट लोणचे असल्याशिवाय जेवणच पूर्ण होत नाही. त्यामुळे जेवणाची रंगत वाढवणारे लोणचे प्रत्येक घरातील अविभाज्य असा घटक बनला आहे. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे घरोघरी लोणचे बनवण्याची तयारी सुरू झाली आहे.

### मसाल्यांचे दर तेजीत

लोणच्यासाठी लागणारे शेंगदाणा तेल, गरम मसाले, मोहरी, हिंग, लवंग, हळद, बडीशेप, धने, दालचिनी, वेलची, मोहरी डाळीचे भाव कितीही वधारले तरी घरगुती लोणचे तयार केले जाते. त्यामुळे ग्रामीण तसेच शहरी भागांत लोणच्यासाठी लागणारा मसाला घेण्यासाठी बाजारांत गर्दी होत आहे.

# रस्त्यासाठी ग्रामस्थांचे मचाण बांधून आंदोलन



**खामगाव, ८ जून (गुड इव्हिनिंग सिटी) :** तालुक्यातील वकाना ते निरोड व वकाना ते भिलखेड रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्यात यावे, या मागणीसाठी वकाना येथील ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष विजय वानखडे यांच्या नेतृत्वात ग्रामस्थांनी ६ जून पासुन निंबाच्या झाडावर मचान बांधून आंदोलन सुरु केले आहे.

वकाना ते निरोड व वकाना ते भिलखेड हे दोन्ही रस्ते तालुक्याला जोडणारे आहेत. परंतु मागील पाच ते सहा वर्षापासुन या दोन्ही रस्त्याचे काम रखडलेल्या अवस्थेत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसह व गावकऱ्यांना तालुक्याच्या ठिकाणी शासकीय कामासाठी तसेच शेतातील शेतमाल घरापर्यंत आणण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. या दोन्ही रस्त्यासाठी शेतकऱ्यांनी रितसर रस्त्याचे दानपत्र सुद्धा दिले आहे. परंतु शासनाकडून हेतू पुरस्पर राजकीय दबावापोटी हे दोन्ही रस्ते थांबवण्याचे काम केले.

निवेदन देण्यात आले होते. परंतु अद्याप निवेदनाची कुठलीही दखल न घेतल्यामुळे पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष विजय वानखडे यांच्या नेतृत्वात वकाना येथील ग्रामस्थांनी झाडावर मचाण बांधून आंदोलन सुरू केले.

# राहेरा येथील पूर्णत्वास येत असलेल्या धरणाची आ.गायकवाड यांनी केली पाहणी



**मोताळा, ८ जून (गुड इव्हिनिंग सिटी) :** बुलढाणा विधानसभा मतदारसंघातील मोताळा तालुक्यातील ग्राम.राहेरा येथे २००८ पासून धरणाचे ४०% काम हे ८ वर्ष सुरू होते परंतु हा प्रकल्प निधी अभावी रखडून पडला होता मागील दोन वर्षापासून बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड यांच्या कार्यतत्परतेमुळे तसेच नियोजनामुळे धरणाचे उर्वरित ७० टक्के कामाकरिता २५ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देऊन अत्यंत जलद गतीने मागील ४ महिन्यांमध्ये धरणाचे उर्वरित ८०% काम अंतिम टप्प्यात पूर्ण करून धरणाची धार दाबण्यात आलेली आहे, यामुळे आजूबाजूची १२०० एकर जमीन ओलिताखाली येणार आहे, यावेळी उपसासिंचन योजनेकरिता देखील २० कोटी रुपये धर्मवीर आमदार संजय गायकवाड यांनी मंजूर करून घेतले तसेच कोर्टाने आदेश दिल्यामुळे बुडीत क्षेत्रातील जे शेतकरी प्रकल्पग्रस्त होते ज्यांचा या प्रकल्पाला विरोध होता त्यांच्या पुनर्वसनासाठी देखील आमदारांच्या प्रयत्नामुळे वाढीव ४८ कोटी रुपये निधी तसेच सरळ खरेदी झालेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी ०५ लाख रुपये असे एकूण १ कोटी २१ लक्ष त्यामुळे जवळपास आमदार आ.गायकवाड यांच्या प्रयत्नाने एकूण ११० कोटी रुपये आमदार झाल्यापासून मंजूर करून आणून हा प्रकल्प पूर्णत्वास नेला.

यामध्ये गावातील पुनर्वसनाची सर्व कामे जसे की रस्ते, नाल्या, संरक्षणभिंत, शाळा याकरता देखील आ.गायकवाड यांनी १० कोटी रुपयांचा भरीव निधी उपलब्ध करून दिला आणि पाणीपुरवठ्याच्या विहिरीसाठी देखील निधी उपलब्ध करून दिला. या सर्व प्रकल्पामुळे आजूबाजूच्या सर्व डाभा, गुळभेली, राहेरा, खामखेड यासह बाराशे हेक्टर जमीन ही सिंचनाखाली येऊन खऱ्या अर्थाने मोताळा तालुक्यामध्ये हरितक्रांतीची सुरुवात होऊन शेतकऱ्याचे आयुष्य सुखी आणि समृद्ध होणार आहे.

यावेळी त्या ठिकाणी संबंधित कॉन्ट्रॅक्टरने लवकरात-लवकर काम पूर्णत्वास आणल्याबद्दल आमदार संजय गायकवाड यांनी त्यांचे देखील कौतुक केले. यावेळी त्या ठिकाणी शिवसेना, युवासेनेचे पदाधिकारी,शिवसैनिक, पाटबंधारे विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी,संबंधित शासकीय कंत्राटदार तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषद शाळेत साहित्यांची तोडफोड

**मलकापूर, ८ जून (गुड इव्हिनिंग सिटी) :** तालुक्यातील झोडगा ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या धोंगर्डी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत अज्ञात व्यक्तींनी साहित्यांची तोडफोड केल्याची घटना ७ जून रोजी उघडकीस आली आहे. या घटनेमुळे शिक्षण विभागात खळबळ उडाली असून, सरपंच व मुख्याध्यापकांनी पोलिसात तक्रार दाखल केली आहे. तालुक्यातील झोडगा ग्रामपंचायतीत येणाऱ्या धोंगर्डी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गत काळात जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून विकासकामे व साहित्य खरेदी करण्यात आली आहे. शाळेची पाहणी करण्यासाठी मुख्याध्यापक अनिल मेहणकर गेले होते. त्यावेळी वर्ग खोलीच्या खिडक्या, इलेक्ट्रिक बोर्ड, लाईट व लाईट फिटिंगच्या साहित्याची तोडफोड करून नासधूस करण्यात आल्याचा धक्कादायकच प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी सरपंच सुवर्णा संदीप भोळे व शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची, मुख्याध्यापक अनिल मेहणकर यांच्याशी चर्चा झाली. त्या अनुषंगाने पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# 'अंदाज' 'वाणी'



सर्वांच्याच जिव्हाळ्याचा विषय असलेल्या मान्सूनच्या लहरीपणाबाबत जितकी चर्चा होते, तितकीच ती हवामान खात्याच्या लहरीपणाबाबत होऊ लागली आहे. सोशल मीडियावर तर हवामान खात्याचा अंदाज हा विनोदा बरोबर संतापाचाही विषय बनला आहे. 'आज भरपूर पाऊस पडणार', असे भविष्य हवामान खात्याने वर्तवले की, त्या दिवशी पाऊस हमखास येणार नाही, असे गृहीत धरले जाते. गेल्या काही वर्षांत हवामान खात्याकडून दिले जाणारे मोसमी पावसाचे अंदाज बहुतांशी फसत चालल्याने खात्याच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. सोबतच स्थानिक पातळीवर पीक पेरणीचे निर्णय घेण्यासाठी हवामान खात्याचे अंदाज अत्यंत कुचकामी ठरत असल्याने शेतकऱ्यांमध्येही या खात्याबद्दल कमालीची नाराजी आहे. ही नाराजी आता प्रकट होऊ लागली असून पावसाचे अंदाज सतत चुकल्याने उद्विग्न झालेल्या एका शेतकऱ्याने पुणे आणि कुलाबा वेध शाळेविरोधात पोलिसांकडे फसवणूकीची तक्रार केली आहे. पावसाबद्दलचे खोटे अंदाज व्यक्त केल्याने राज्यभरातील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप करत हवामान खात्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी एका शेतकऱ्याने केली आहे.

अर्थात पावसाचा अंदाज वर्तवणं म्हणजे पोपटानं उचलेल्या चिठ्ठीतलं भविष्य वर्तवणे किंवा नंदी बैलानं मान डोलावून सांगण्या सारखा सोपा विषय निश्चितच नाही. त्यासाठी अत्यंत काटेकोरपणानं प्रचंड आकडेवारीच्या हिशेबातून, आलेखांच्या जंजाळातून सॉफ्टवेअरच्या सहाय्यानं गणित सोडवावी लागतात. म्हणूनच याला 'फोरकास्ट' म्हणजेच 'अंदाज' किंवा 'अनुमान' असं म्हटलं जातं. त्यामुळे तो अचूक ठरेलच असे नसते. परंतु पावसाबाबत हवामान खात्याचे अंदाज 'अंदाजी' ही चुकू लागल्याने चिंतेचा विषय बनले आहे.

हवामान अंदाजाचं महत्त्व हवाई वाहतूक आणि कृषी क्षेत्रात फार महत्वाच आहे. भारतीय शेती अजूनही मोसमी पावसावर पूर्णपणे अवलंबून असल्याने हवामान खात्याकडून दिल्या जाणाऱ्या पावसाच्या अंदाजाकडे सर्वांचे डोळे लागले असतात. राज्यातीलच नव्हे तेर देशातील बहुतांश शेतकरी वेधशाळेच्या अंदाजानुसार शेतीचे वेळापत्रक ठरवितात. मान्सूनच्या अंदाजावर पेरणीचे गणित अवलंबून असते. त्यामुळे हवामान खात्याचा अंदाज फसला कि शेतकरी कोलमडतो. यंदा वेधशाळेने सरासरीपेक्षा जास्त पाऊस होणार असल्याचे भाकीत एप्रिल मे मधेच व्यक्त केले होते. त्यावर विसंबून राज्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणत पेरण्या केल्या, त्यासाठी महागडे बियाणे खरेदी केली. मात्र अपेक्षेनुसार पाऊस झाला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट उभे राहिले होते. जिल्ह्यात सुदैवाने अगदी ऐन शेवटच्या वेळी वरून राजा बरसल्याने पिके वाचलीत, मात्र काही ठिकाणी शेतकऱ्यांना दुबार पेरणीला सामोरे जावे लागत आहे. अशाच एका त्रस्त झालेल्या बीड जिल्ह्यातील गंगाभीषण थावरे या शेतकऱ्याने वेधशाळेवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. इतक्या यंत्रणा राबवूनही आपल्या हवामान खात्याचे अंदाज का बरं चुकतात? असा सर्वांना पडणारा प्रश्न थावरे यांनाही पडला असावा. बी-बियाणे तसेच रासायनिक खतांच्या कंपनीसोबत हवामान खात्याचे आर्थिक लागेबांधे असण्याची श्यक्यता ही त्यांनी आपल्या तक्रारीत नमूद केले आहे. अर्थात यात काही सत्यता आहे का? हे तपासात कळेलंच. मात्र हवामान खात्याच्या अंदाज 'वाणी' संदर्भात या शेतकऱ्याने उपस्थति केलेले प्रश्न निश्चितच चिंतनीय आहेत.

भारतात आज अनेक संस्था हवामानाचे अंदाज वर्तवतात. तरीही आयएमडी म्हणजे इंडियन मट्रोलॉजिकल डिपार्टमेंट ज्याला आपण वेधशाळा म्हणतो, हीच सरकारनं मान्यता दिलेली एकमेव वेधशाळा आहे. गेल्या १३७ वर्षांपासून आयएमडी हवामानाचा अंदाज वर्तविण्याच काम करतेय. काळानुसार या संस्थेत सातत्यानं बदल घडवून आणल्या गेले, नवनवीन यंत्रणासाठी कोट्यावधीचा खर्च करून तिला नेहमी अद्ययावत करण्यात आले. मात्र तरीही हवामान खात्याचे अंदाज सपशेल चुकतात याचा अर्थ या खात्यात गांभीर्याने काम केल्या जात नाही असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. वेधशाळा पोसण्यासाठी कोट्यावधी रुपयांचा खर्च केला जातो. मात्र या खात्याला अचूक अंदाज वर्तविण्याचे कोणतेच बंधन घातले जात नाही, किंवा अंदाज चुकल्यावर त्यांना साधी विचारणाही केली जात नाही. मुळात सरकारी यंत्रणाच या खात्याच्या बाबतीत उदासीन असल्याने हे खाते आपली विश्वासहर्ता गमावून बसले आहे. परदेशात हवामानाचा अचूक अंदाज सांगणाऱ्या संस्था आहेत. त्यामुळे त्यांना नैसर्गिक आपत्तीची वेळेआधी माहिती मिळते आणि त्यावर उपाय योजना करायाला वेळ मिळतो. भारतातही अशी यंत्रणा उभी राहिल्यास त्याचा मोठा लाभ देशातील शेतकऱ्यांना होऊ शकेल.

आज संपूर्ण देशात शेती सुधारणेचा विषय ऐरणीवर आला आहे. आधुनिक तंत्रज्ञाने शेती करावी असा सल्ला देणारेही कमी नाहीत. मात्र ज्या अंदाजावर शेतीचे गणित अवलंबून असते त्याबाबत दुर्दैवाने कुणी काहीच बोलत नाही. पावसाचा अचूक अंदाज जर शेतकऱ्यांना समजला तर शेतीतील बरेचशे नुकसान टाळत येऊ शकेल. मान्सूनच्या अचूक आगमनावर शेतकऱ्यांना पेरण्या करता येतील. अवकाळी, अतिवृष्टी, गारपीठ याचाही अंदाज शेतकऱ्यांना समजला पाहिजे. त्यासाठी अचूक हवामान अंदाज वर्तवणारी यंत्रणा उभारणे गरजेचे आहे. नुसती यंत्रणा उभारून चालणार नाही तर तिची उपलब्धता वेळोवेळी तपासली गेली पाहिजे. अतिवृष्टीचा इशारा असो की वातावरणातील उष्मा, नागरिकांना हवामान विषयक अधिकृत आणि अचूक माहिती मोबाइलवर मिळावी अशी व्यवस्था उपलब्ध करणे गरजेचे आहे. आज हवामान विषयक माहिती देणारे अनेक ॲप्स मोबाईलवर उपलब्ध असले तरी त्यातून मिळणाऱ्या माहितीच्या अचूकतेवर प्रश्नचिन्ह असते. विशेषतः पावसाळ्यात अनेकांना पुढील २४ तासांच्या पूर्वानुमानापेक्षा येत्या चार ते सहा तासांत आपल्या शहराचे हवामान कसे असेल हे जाणून घेण्यात अधिक रस असतो. ही सर्व माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचवणारी विश्वासहार्य यंत्रणा कार्यन्वित करणे गरजेचे बनले आहे.

अर्थात हवामानाचा अंदाज वर्तविणे साधेसोपे काम मुळीच नाही. मान्सूनचा अंदाज वर्तवण्यासाठी अनेक निकष पाहिले जातात. हे निकष अत्यंत किचकट तसेच गुंतागुंतीचे असतात. तापमान, हवेचा दाब, वाऱ्याची दिशा आदी अनेक बाबींच्या अभ्यासाअंती हनुमानाचे अनुमान काढले जाते, हे सत्य असले तरी एखाद्या संस्थेचे वर्षानुवर्षांपासून अंदाज चुकत असतील तर काही तर चुकतेय हे लक्षात घेतलं पाहिजे. वेधशाळेचं उद्दिष्टच मुळात लोकांना हवामानाचं वृत्त देऊन मनुष्यहानी आणि संपत्तीची हानी टाळणं हे आहे. यात जर ही संस्था अयशस्वी ठरत असेल तर हा पांढरा हत्ती सांभाळायचा कि नाही? याबाबत निर्णय घेणे जरुरीचे आहे..!!!

गुड इव्हिनिंग City

# प्रगतीमंत्र

## ITI प्रवेशासाठी २७ जूनपर्यंत मुदतवाढ मिळाली



**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत आयटीआय प्रवेशासाठी आता २६ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. प्रवेश अर्ज निश्चित करण्यासाठी २७ जूनपर्यंत संधी देण्यात आली आहे.**

आयटीआय प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने १५ मे २०२५ पासून राबवण्यात येत असून, प्रवेश अर्ज करणे, प्रवेश अर्ज निश्चित करणे आणि पहिल्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करणे ही सर्व प्रक्रिया उमेदवारांना २७ जूनपर्यंत करणे आवश्यक असणार आहे. प्राथमिक गुणवत्ता यादी ३० जूनला सकाळी ११ वाजता जाहीर करण्यात येणार आहे. अंतिम गुणवत्ता यादी ३ जुलै रोजी प्रकाशित केली जाणार आहे. पहिल्या प्रवेश फेरीसाठी संस्था आणि व्यवसायनिहाय निवड यादी संकेतस्थळावर ९ जुलैला प्रकाशित करण्यात येणार आहे. १० ते १५ जुलैदरम्यान विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावा लागणार आहे. त्यानंतर दुसऱ्या फेरीची प्रवेश प्रक्रिया सुरू होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांसाठी ६ जूनपासून चॅटबॉटचीही व्यवस्था सुरू करण्यात आली आहे. चॅटबॉटद्वारे मदत करण्याबरोबरच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने प्रत्येक विभागात मदत संपर्क क्रमांक दिले आहेत.

### आयटीआयसाठी ७८,४०६ इतके प्रवेश निश्चित

राज्यात आयटीआयसाठी एकूण विद्यार्थी नोंदणी १ लाख ३९ हजार ३२ एवढी झाली आहे तर १ लाख २७ हजार ४५७ विद्यार्थ्यांनी पूर्ण अर्ज भरले आहेत. १ लाख २५ हजार ५ विद्यार्थ्यांनी शुल्क भरणा केला आहे, तर ७८ हजार ४०६ इतके प्रवेश निश्चित झाले आहेत. पर्यायी अर्ज भरलेले विद्यार्थी ६८ हजार ५८३ इतके आहेत, अशी माहिती व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने दिली आहे.



# अभियांत्रिकी प्रवेश : आता तीन नव्हे चार 'कॅप' फेऱ्या !

**राज्यातील अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये आता तीनऐवजी चार प्रवेश फेऱ्या राबविण्यात येणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून या नव्या नियमावलीची अंमलबजावणी होत आहे. प्रवेशासाठी महाविद्यालय पसंतीमध्येही यंदा बदल केला जाणार असून पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांचे प्रवेशासाठी दिलेले प्राधान्यक्रम अनुक्रमे एक, तीन आणि सहा महाविद्यालय असे असणार आहे. याबरोबरच व्यवस्थापन कोट्यातून भरणाऱ्या जागांचे अर्ज सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध होणार असून, या कोट्यातील होणारे प्रवेशही संस्थांना मेरिटनुसारच भरावे लागणार आहेत.**



अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेच्या आतापर्यंत तीन फेऱ्या राबविल्या जायच्या. मात्र, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून या अभ्यासक्रमांच्या चार फेऱ्या राबविण्यात



येणार आहेत. दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या फेरीसाठी पात्र असलेल्या उमेदवाराने भरलेल्या पर्यायी अर्जामध्ये बदल करण्याची सुविधा मिळणार आहे. मागील फेऱ्यांमध्ये पर्यायी अर्ज भरण्यात अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांना या चौथ्या फेरीमध्ये पर्यायी अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. कॅप फेऱ्यांची संख्या वाढवून आता चौथी कॅप फेरी समाविष्ट करण्यात आली आहे. यापूर्वी तीन फेऱ्यांनंतर प्रवेश प्रक्रिया संपुष्टात येत होती. आता चौथ्या फेरीअंती प्रवेश अंतिम करण्यात येणार असून, दुसऱ्या फेरीनंतर अभ्यासक्रमांचा प्रवेश अंतिम ठरणार आहे. आतापर्यंतच्या मर्यादित फेऱ्यांमुळे अनेक विद्यार्थ्यांना खासगी किंवा व्यवस्थापन कोट्यातील महागड्या प्रवेशांचा पर्याय स्वीकारावा लागत होता. चौथ्या फेरीमुळे विद्यार्थ्यांना अधिक संधी उपलब्ध होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### प्राधान्यक्रमानुसार महाविद्यालय निवडणे महत्त्वाचे...

- पहिल्या फेरीत : जर विद्यार्थ्याला त्याच्या पहिल्या पसंतीच्या महाविद्यालयात प्रवेश मिळाला, तर त्याला तो तत्काळ निश्चित करावा लागेल.
- दुसऱ्या फेरीत : जर त्याला पहिल्या तीन पसंतीपैकी एक महाविद्यालय मिळाले, तर प्रवेश घेणे अनिवार्य असेल; अन्यथा पुढील फेऱ्यांसाठी अपात्र ठरविले जाईल.
- तिसऱ्या फेरीत : जर विद्यार्थ्याला पहिल्या सहा पसंतीपैकी कोणतेही महाविद्यालय मिळाले, तर त्याला प्रवेश घ्यावाच लागेल.

### व्यवस्थापन कोटा होणार आता पारदर्शक

व्यवस्थापन कोट्यातील उपलब्ध जागांची संपूर्ण माहिती महाविद्यालयांना संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना सीईटी कक्षाच्या पोर्टलवरूनही या जागांसाठी अर्ज करता येणार आहे. ही सुविधा यंदा केली आहे. तसेच थेट संस्थेकडे जाऊनही हे अर्ज करता येतील. मात्र, हे प्रवेश पूर्णपणे गुणवत्तेच्या आधारावर होतील. शुल्क नियामक प्राधिकरणाच्या निर्देशानुसार या विद्यार्थ्यांकडून नियमित शुल्काच्या तिप्पट शुल्क आणि एनआरआय विद्यार्थ्यांकडून नियमित शुल्काच्या पाचपट शुल्क आकारण्याची मुभा संस्थांना असणार आहे. एनआरआय कोट्यातून प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना आयकर विभागाचे प्रमाणपत्र सादर करायचे आहे. तसेच पाल्य-पालक कायद्यानुसारच हे प्रवेश भरले जाणार आहेत.

# NDA, NA साठी ऑनलाइन अर्ज भरणे सुरू, अंतिम तारिख १७ जून!

**केंद्रीय लोकसेवा आयोग अर्थात यूपीएससीने राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए )आणि नौदल अकादमी (एनए) परीक्षा (२) आणि संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा (सीडीएस २) साठी अधिसूचना जाहीर केली आहे. या भरती परीक्षेसाठी पात्रता पूर्ण करणारे उमेदवार यूपीएससीच्या अधिकृत वेबसाइट upsc.gov.in ला ऑनलाइन पद्धतीने भेट देऊन अर्ज भरू शकतात. अर्ज करण्याची अंतिम तारीख १७जून २०२५ आहे.**

एनडीएसाठी अर्ज करणारा उमेदवार मान्यताप्राप्त बोर्ड, संस्थेतून बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. एनए/१०+२ उमेदवारासाठी भौतिकशास्त्र आणि गणित विषयांसह बारावी उत्तीर्ण किंवा त्यात शिक्षण घेत असावा. सीडीएस पदांसाठी अर्ज करण्यासाठी उमेदवाराकडे मान्यताप्राप्त विद्यापीठ, संस्थेची अभियांत्रिकी पदवी असणे आवश्यक आहे. उमेदवारांनी निर्धारित वयोमर्यादा देखील पूर्ण केलेली असावी. या भरतीमध्ये अर्ज करण्यासाठी उमेदवारांनी प्रथम यूपीएससीच्या अधिकृत वेबसाइटला भेट देऊन आवश्यक तपशील भरून एक वेळ नोंदणी (ओटीआर) करावी लागेल. त्यानंतर उमेदवार इतर तपशील, स्वाक्षरी, छायाचित्र इत्यादी अपलोड करून अर्ज प्रक्रिया पूर्ण करू शकतात. या भरतीमध्ये सहभागी होण्यासाठी सामान्य, ओबीसी आणि ईडब्ल्यूएस श्रेणीतील उमेदवारांना २०० रुपये भरावे लागतील. याशिवाय सर्व श्रेणीतील एससी, एसटी आणि महिला उमेदवार या भरतीत सामील होण्यासाठी मोफत अर्ज करू शकतात. अर्ज शुल्क ऑनलाइन भरता येते. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांना अधिकृत वेबसाइटला भेट देण्यासाठी सूचित केले आहे.

### आवश्यक कागदपत्रे

अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी आधीच सक्रिय ई-मेल आणि मोबाईल नंबर, फोटो, स्वाक्षरी, सर्व शैक्षणिक कागदपत्रे, आधार कार्ड इत्यादी सोबत ठेवावेत. अर्ज शुल्क जमा करण्यासाठी क्रेडिट कार्ड आणि डेबिट कार्डचा वापर करता येणार आहे.



# MHT-CET निकाल १६ जूनला



### निकालाच्या संभाव्य तारखा

- बी. डिझाईन सीईटी - ९ जून
- एमएचटी-सीईटी-१६ जून
- एलएलबी ३ वर्षे सीईटी- १७ जून

**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतलेल्या प्रवेश परीक्षांच्या सहा अभ्यासक्रमांच्या निकालाची संभाव्य तारीख जाहीर केली आहे. त्यानुसार ४ ते १७ जूनदरम्यान सहा अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात येणार आहेत. तब्बल पाच लाखांहून अधिक विद्यार्थी प्रतीक्षेत असलेल्या एमएचटी सीईटीचा पीसीबी आणि पीसीएम या दोन्ही गटांचा निकाल १६ जून रोजी जाहीर करण्यात येणार आहे.**

### एमएचटी सीईटीच्या दोन्ही गटांत ४० चुका

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी कक्ष) ९ एप्रिल ते ५ मे दरम्यान एमएचटी सीईटीची परीक्षा घेतली. २८ सत्रांमध्ये झालेल्या या परीक्षेमध्ये ४० प्रश्न चुकीचे असल्याचे आढळले आहेत. यामध्ये सर्वाधिक गणित विषयामध्ये २८ प्रश्न, भौतिकशास्त्रात सात, रसायनशास्त्रामध्ये चार आणि जीवशास्त्रमध्ये एक प्रश्न चुकीचा आहे. त्यामुळे ज्या सत्रामध्ये प्रश्न चुकीचे असल्याचे निदर्शनास आले आहे, त्या सत्रातील प्रत्येक विद्यार्थ्याला चुकीच्या एका प्रश्नासाठी एक गुण देण्यात येणार असल्याचे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून जाहीर केले आहे.

# तंत्रमंत्र

गुड इव्हिनिंग City

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# सायबर विश्वावर नवे संकट!




## 'ट्रोजन हॉर्स' मालवेअर

**ट्रोजन वॉरदरम्यान ट्रॉयमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी ग्रीकांनी लाकडाचा मोठा घोडा बनविला. हा घोडा आतून पोकळ होता. त्यात ग्रीकांनी आपले सैनिक लपवले. नंतर त्यांनी ट्रॉयना सांगितले की हा घोडा देवीला अर्पण आहे. यामुळे ट्रॉय अभेद्य होईल. ट्रॉयना घातपात होण्याचा इशारा असतानासुद्धा त्यांनी हा मोठा लाकडी घोडा शहराच्या वेशीच्या आत नेला. ग्रीकांनी जेव्हा ट्रॉय सोडून जाण्याचे नाटक केले. जेव्हा घोडा ट्रॉयच्या वेशीतून आत आणला गेला त्या रात्री घोड्यात लपलेले सैनिक घोड्यातून बाहेर पडले व त्यांनी ट्रॉयच्या वेशीचे दरवाजे ग्रीक सैनिकांसाठी उघडले. त्यानंतर ट्रॉयवर हल्ला झाला. ग्रीकांनी जी गोष्ट ट्रॉयबाबत केली, त्याच धर्तीवर सायबर गुन्हेगार ट्रोजन हॉर्स मालवेअरच्या मदतीने गुन्हा करतो. सध्याच्या संगणक युगात 'ट्रोजन हॉर्स' किंवा 'ट्रोजन' हा एक प्रकारचा दुर्भावनायुक्त कोड (Malicious Code) आहे जो दिसताना वैध, कायदेशीर दिसतो, परंतु आपल्या संगणक किंवा मोबाईलला हानी पोहोचवू शकतो...**

ट्रोजन हॉर्स मालवेअर एकदा इन्स्टॉल झाले, की कोडमध्ये लिहिल्यानुसार कार्य करू लागते. ट्रोजन कार्य कसे करते, हे जाणून घेणे आवश्यक आहे. आपल्याला बऱ्याच ई-मेल येत असतात. त्यापैकी एखादी वैध दिसणारी, आपल्या ओळखीची वाटणारी, ओळखीच्या व्यक्तीकडून आल्याचे भासवणारी मेल ट्रोजन असलेली ई-मेल असू शकते. आपल्याला आलेल्या अशा प्रकारच्या ई-मेलमध्ये एखादी लिंक देण्यात आलेली असते किंवा एखादी फाईल जोडून पाठविण्यात आलेली असू शकते. अशा ईमेलची खात्री न करता आपल्याकडून अनाहूतपणे लिंकवर क्लिक केले जाते किंवा जोडून आलेली फाईल संगणकावर किंवा मोबाईलवर डाऊनलोड केली जाते व उघडली किंवा इन्स्टॉल केली जाते. त्यामुळे संगणकावर किंवा मोबाईलवर ट्रोजन मालवेअर इंस्टॉल होते. जेव्हा आपण संगणक किंवा मोबाईलवरील एखादा प्रोग्रॅम वापरायचा प्रयत्न करतो, तेव्हा हा मालवेअर संगणकावरील किंवा मोबाईलवरील अन्य फाईल्समध्ये पसरतो. ट्रोजन हॉर्स मालवेअर संगणक किंवा मोबाईलवर आले, तर काय होऊ शकते तर मालवेअर संगणक, मोबाईलवर नियंत्रण ठेवू शकते. ट्रोजन हॉर्सची रचना संगणकामधील डेटा चोरी करणे, डेटाला हानी पोहोचविणे, नेटवर्कमध्ये व्यत्यय आणणे या कामासाठी केलेली असते. त्यामुळे संगणक, मोबाईलला तसेच त्यामधील डेटाला हानी पोहोचू शकते.





### कोणती काळजी घ्यावी..?

- संगणक, मोबाईलच्या सुरक्षेसाठी अँन्टी व्हायरस सॉफ्टवेअर इन्स्टॉल करावे व ठराविक कालावधीने संगणक, मोबाईल स्कॅन करावे.
- फ्री अँन्टी व्हायरस सॉफ्टवेअर कधीही इन्स्टॉल करू नये. अशा सॉफ्टवेअरची क्षमता मर्यादित असते.
- आवश्यक व महत्त्वाच्या फाईल्सचा वेळोवेळी बॅकअप घ्यावा. जेणेकरून ट्रोजनमुळे बाधित झालेल्या फाईल्स पुनर्स्थापित (Restore) करणे सोपे जाईल.
- ई-मेलला जोडून आलेली फाईल डाऊनलोड करण्यापूर्वी ईमेल अँन्टी व्हायरसच्या मदतीने पूर्णपणे स्कॅन करून घ्यावे.
- प्रत्येक खात्यासाठी वेगळा पासवर्ड द्यावा. देण्यात येणारा पासवर्ड सोपा व कोणालाही पटकन ओळखता येणार नाही, असा असावा. पासवर्ड तयार करताना शब्द अंक व विशिष्ट संकेत चिन्ह (@, #, $, * इत्यादी) याचा वापर करावा. शब्द वापरताना इंग्रजीतील मोठ्या व छोट्या दोन्ही अक्षरांचा वापर करावा.
- ई-मेलवर आलेल्या लिंकबाबत खात्री असल्याशिवाय लिंकवर क्लिक करू नये.
- ई-मेलला जोडण्यात आलेल्या फाईलबाबत खात्री केल्याशिवाय फाईल डाउनलोड करू नये, तसेच इन्स्टॉल करू नये.

# ...तर खात्यातून रक्कम गायब होणार!

**सर्वसामान्य नागरिकांना गंडवण्यासाठी सायबर चोरटे रोज नवनवी शक्कल लढवत आहेत. आता चोरट्यांनी ट्रोजन या व्हायरसचा वापर सुरू केल्याचे काही घटनांमधून समोर आले आहे. लिंक, पीडीएफ किंवा ॲप फाइलच्या माध्यमातून हा व्हायरस पाठवून मोबाइल हॅक केला जातो. त्यानंतर बँक खात्यातील रक्कम परस्पर अन्य खात्यात पाठवली जाते. त्यामुळे नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.**

सायबर चोरटे खातेधारकांना आधार कार्ड, पॅन कार्ड अपडेट करण्यास सांगतात. त्यासाठी नागरिकांच्या मोबाइलवर लिंक, पीडीएफ किंवा ॲप फाइल पाठवली जाते. खातेधारकांनी त्यावर क्लिक केल्यास मोबाइलमध्ये ट्रोजन व्हायरस शिरतो. त्याच्या मदतीने चोरटे मोबाइल हॅक करतात. मोबाइलमधील बँकेचे ॲप, ऑनलाइन ट्रान्झेक्शन ॲपचा वापर करून बँक खात्यातील रक्कम इतर खात्यावर परस्पर पाठवली जाते. बँक खात्यातून रक्कम इतर बँक खात्यावर पाठवल्यानंतर खातेधारकाला त्याबाबत बँकेकडून एसएमएस पाठवला जातो. तो वाचल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे खातेधारकांच्या लक्षात येते. खातेधारक पोलीस ठाण्यात किंवा सायबर सेलकडे धाव घेऊन तक्रार नोंदवतात. मात्र, यादरम्यानच्या काही मिनिटांत सायबर चोरटे हस्तांतरित करून घेतलेल्या बँक खात्यावरून अन्य बँक खात्यांवर छोट्या रकमा पाठवतात. पोलिसांना त्यामुळे सायबर पत्रव्यवहार करून रक्कम होल्ड करण्यात अडचणी येतात.



### मोबाइलमध्ये व्हायरस

छत्रपती संभाजीनगरातील सिडको एन-१ येथील एका महिलेच्या मोबाइलवर सायबर चोरट्याने पीडीएफ फाइल पाठवली. महिलेने फाइल ओपन केली असता त्यांच्या बँक खात्यातून ३६ हजार रुपये आणि यूपीआयद्वारे ९ हजार ५०० रुपये अनोळखी बँक खात्यावर परस्पर हस्तांतरित करून घेतले. पैसे खात्यातून गेल्याचे समजताच महिलेने पोलिसांत धाव घेतली. सायबर विभागाने तपास केला असता चोरट्याने पीडीएफ फाइलद्वारे व्हायरस पाठवल्याचे समोर आले.

### अशी घ्या काळजी...

एखादी फाइल किंवा ॲप डाऊनलोड केल्यास आपण व्हायरस टोटल डॉट कॉम वेबसाइटवर पडताळणी करावी. फसवणूक झाल्यास तत्काळ जवळच्या पोलिस ठाण्यात तक्रार करावी. १९३० क्रमांकावर संपर्क साधून तत्काळ माहिती देऊन तक्रार नोंदवावी. नागरिकांनी खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनोळखी क्रमांकावरून आलेल्या लिंक किंवा पीडीएफ फाइलवर क्लिक करू नये. अनोळखी व्यक्तीला फोनवर कोणतीही गोपनीय माहिती देऊ नका. त्याच्या सांगण्यावरून कोणतीही कृती करू नये. एखादी फाइल, ॲप इन्स्टॉल केल्यानंतर ते मोबाइलच्या बॅकग्राउंडला काम करते. त्यामुळे मोबाइल हॅक करणे शक्य होते.

# कमकुवत मोबाईल नेटवर्कमुळे कंटाळलेत?

**फोनमध्ये नेटवर्क नसण्याची समस्या आजची नाही तर ती फार पूर्वीपासून आहे. आज 5G नेटवर्क असूनही फोनला नेटवर्क मिळत नाही, असे अनेकदा घडते. ही समस्या अगदी सामान्य आहे आणि लोकांना खूप त्रास होतो. जेव्हा आपल्याला एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीशी बोलायचे असते तेव्हा ही समस्या अधिक उद्‌भवते. तथापि, हे देखील हाताळणे सोपे आहे. कधी-कधी फोनची काही छोटी-छोटी सेटिंग्जही तुम्हाला या समस्येपासून मुक्त करू शकतात. येथे आम्ही तुम्हाला ४ टिप्स देत आहोत ज्याद्वारे तुम्ही मोबाईल नेटवर्क समस्या दूर करू शकता...**

- फोन रीस्टार्ट करा : जेव्हा जेव्हा तुम्हाला नेटवर्कची समस्या येते तेव्हा त्यापासून मुक्त होण्यासाठी सर्वप्रथम तुम्ही फोन रीस्टार्ट करावा. फोन बंद करा आणि नंतर काही वेळ चालू करा. बऱ्याच वेळा हे समस्येचे निराकरण करते.
- एअरप्लेन मोड चालू करा : रीस्टार्ट केल्याने काम होत नसेल तर तुम्ही फोन एअरप्लेन मोडवर ठेवू शकता. हे नेटवर्क स्थिर ठेवण्यास मदत करते.
- सॉफ्टवेअर : तुम्ही फोन नेहमी अपडेट ठेवला पाहिजे. बग असला तरी तो दुरुस्त होतो. तसेच, Wi-Fi सक्रिय असल्यास ते डिस्कनेक्ट करा आणि पुन्हा कनेक्ट करण्याचा प्रयत्न करा.
- सिग्नल स्ट्रेंथ तपासा : जर तुम्हाला तुमच्या फोनमध्ये मोबाईल नेटवर्कची समस्या येत असेल तर तुम्ही फोनची सिग्नल स्ट्रेंथ तपासली पाहिजे. जर तुमच्या आजूबाजूचे कव्हरेज चांगले नसेल तर तुम्हाला नेटवर्कच्या समस्यांना नक्कीच सामोरे जावे लागेल. हे टाळण्यासाठी तुम्ही तुमच्या घरात नेटवर्क बूस्टर देखील स्थापित करू शकता.

# गुड इव्हिनिंग City



८ जून २०२५, रविवार






# हिंदी भाषेच्या सुधारित निर्णयात 'अनिवार्य' शब्द हटणार!

## मुख्यमंत्र्यांकडे लवकरच बैठक; तिसऱ्या भाषेबाबत पालक, विद्यार्थ्यांशी संवाद



**मुंबई, ८ जून (वृत्तसंस्था)** : पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीच्या निर्णयावर शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी २२ एप्रिल रोजी स्थगिती दिली. राज्यातील शाळा सुरू होण्यास अवघे आठ दिवस उरले असतानाच, अजूनही सुधारित निर्णय काढण्यात आलेला नाही. दरम्यान, शिक्षण विभागातील एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने सांगितले की, शासनस्तरावर यासंदर्भात सखोल विचारमंथन सुरू आहे. अनिवार्य हा शब्द नव्या निर्णयातून हटवण्यात येणार आहे. मात्र, तिसऱ्या भाषेबाबत निर्णय घेताना पालक, विद्यार्थ्यांशी संवाद साधला जात असून तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले जात आहे. यासंदर्भात लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. त्यानंतरच सुधारित निर्णय जाहीर होईल, असेही अधिकाऱ्याने स्पष्ट केले.

राज्य सरकारने नव्या शैक्षणिक धोरणांतर्गत इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा बंधनकारक केली. सर्वच स्तरांतून यावर टीकेची झोड उठल्यानंतर स्थगिती द्यावी लागली. शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी हिंदी सक्तीच्या निर्णयाला स्थगिती दिली.

पावसाच्या लवकर आगमनामुळे विदर्भ विभागातील शाळा यंदा ८ दिवस आधी म्हणजे २३ जूनपासून सुरू होणार आहेत. सुरुवातीचा आठवडा सकाळी ७ ते ११.४५ या वेळेत असेल. ३० जूनपासून नियमित वेळापत्रक लागू होईल. दरवर्षी उष्णतेमुळे विदर्भातील शाळा जुलैच्या पहिल्या आठवड्यात सुरू होत असत. मात्र यंदा हवामानातील बदलामुळे आणि पावसाच्या सुरुवातीमुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

मुंबईसह पुणे, नाशिक, कोकण, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील इतर भागातील शाळा सोमवार, १६ जूनपासून सुरू होणार आहेत. शिक्षण संचालनालय, माध्यमिक व उच्च माध्यमिक, पुणे यांनी याबाबतचे अधिकृत परिपत्रक जारी केले आहे. राज्यात १ लाख आसपास शाळा असून २ कोटी ८ लाख विद्यार्थी संख्या आहे. महाराष्ट्रातील सर्व राज्य मंडळाच्या शाळांसाठी २ मे २०२५ पासून उन्हाळी सुट्टी लागू केली होती. नवीन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची सुरुवात विभागनिहाय वेगवेगळी होणार आहे. शाळा प्रशासनांनी या सूचना आपल्या अधीनस्थ शाळांना त्वरीत कळवाव्यात, असे आवाहन शिक्षण संचालकांनी केले आहे.

# म्हशींची वाहतूक करणारा पोलिसांनी ट्रक पकडला

**खामगाव, ८ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : निर्दयीपणे कोंबून म्हशींची वाहतुक करणारा एक आयशर ट्रक शिवाजी नगर पोलिसांनी काल रात्री मध्यरात्रीचे सुमारास बायपास वरील हॉटेल दशमेश जवळ पकडला. यावेळी पोलिसांनी ट्रकमध्ये असलेल्या २१ जनावरांची सुटका केली आहे.

जनावरांची वाहतुक होत असल्याची माहिती शिवाजी नगर पोलिसांना मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी काल मध्यरात्री बायपास वरील दसमेश हॉटेल समोर नाकाबंदी करून एम एच २८ बी बी ३९७५ या क्रमांकाच्या आयशर ट्रकला थांबवून त्याची पाहणी कली असता त्यात निर्यापणे कोंबून जनावरे घेवून जात असल्याचे निदर्शनास आले.

यावेळी पोलिसांनी सदर ट्रक ताब्यात घेतला असून त्यातून १४ रेडे व ७ वगारीची सुटका केली. या प्रकरणी पोलिसांनी गजानन वासुदेव जावरकर व अब्दुल नाजीम अब्दुल कलीम दोन्ही रा, तळेगाव मोहणा ता चांदुर बाजार का यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.






# अवैध रेती उपसा करणारे दोन टिप्पर पकडले

**अंढेरा, ८ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : खडकपूर्णा प्रकल्पातून रेतीचा अवैध उपसा सुरू असून, ६ जून रोजी रात्री ९ वाजता देऊळगाव राजा-चिखली मार्गावर अंढेरा फाट्यानजीक तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांच्या पथकाने दोन टिप्पर पकडले. दोन्ही टिप्परमध्ये प्रत्येकी ३ ब्रास रेती विनापरवाना आढळली. पहिल्या टिप्परचा क्रमांक (एमएच-२१-बीएच-२५७१) असून, त्यावर चालक म्हणून देवानंद भानुदास खरात नामक व्यक्ती होता, तर हा टिप्पर जालना जिल्ह्यातील जाफ्राबाद तालुक्यातील छगन तेव्हढे यांच्या मालकीचा आहे. दुसऱ्या टिप्परचा क्रमांक (एमएच-१३- डीक्यू-५२७८) असून, त्यावर चालक म्हणून सचिन खंडू पवार हे होते, तर या टिप्परचे मालक समाधान भानुदास सानप (रा. वाकी बु.) हे आहेत.

# मातंग समाजावर अत्याचार करणाऱ्या आरोपींना अटक करा

## सकल मातंग समाजाच्यावतीने अप्पर पोलिस अधीक्षक यांना निवेदन

**खामगाव, ८ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : तालुक्यातील पारखेड येथील मातंग समाजाच्या कुटुंबावर अत्याचार करणाऱ्यांना तात्काळ अटक करण्यात यावी तसेच त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशा मागणीचे निवेदन सकल मातंग समाजाच्या वतीने ६ जून रोजी अप्पर पोलिस अधीक्षक खामगाव यांना देण्यात आले.

पारखेड येथील ज्ञानेश्वर श्रीकृष्ण लाहुडकर, गजानन श्रीकृष्ण लाहुडकर, परमेश्वर श्रीकृष्ण लाहुडकर हे त्यांच्या घरासमोरील असलेले महादेव ढगे या मातंग समाजाच्या कुटुंबावर अन्याय अत्याचार करत आहे. तर शिवाजी महादेव ढगे यास उपरोक्त तिघांनी अप्पर पोलिस अधीक्षकांना निवेदन देताना मातंग समाजाचे पदाधिकारी मारहाण करतात अशी तक्रार त्यांची पत्नी अंजली शिवाजी ढगे यांनी खामगाव ग्रामीण पोलिसांत दाखल केली असता पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हे दाखल केला आहे.

तरीही अद्यापपर्यंत या आरोपींना अटक झालेले नाही त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी व त्यांच्यावर कडक शासन करण्यात यावे अशा आशयाचे निवेदन अप्पर पोलीस अधीक्षक यांना देण्यात आले. लवकरात लवकर या आरोपींवर कारवाई करण्याची मागणी करत अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

याप्रसंगी संताराम तायडे, कृष्णा नाटेकर महादेव अडायके, शालिग्राम मानकर, गजानन सोनोने, उमेश बाभुळकर, अनिल सुरडकर, आशिष सावळे, मनीष बोरकर, उज्वल कालबागे, यासह समाज बांधव उपस्थित होते.


योजनेमध्ये मोफत उपचार व शस्त्रक्रिया
बुलडाणा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल
क्रिटीकल केअर व ट्रॉमा सेंटर
पत्ता :- आरास ले आऊट, जांभरूण रोड, बुलडाणा (२४ तास सेवा उपलब्ध)
मो. 7575919191, 7575929292,7575939393, 9730650014
(MJPJAY) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, (PMJAY) प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजना संलग्नित
संपुर्ण गटातील कुटूंबासाठी संपूर्ण प्रकाराच्या आजारांवरती मोफत व गुणवत्तापुर्ण उपचार व शस्त्रक्रिया इ.
खालील आजारावरील सुविधा संपूर्ण मोफत
१) नवजात बाळाचे आजार (NICU)
२) लहान मुलांचे संपूर्ण आजार व शस्त्रक्रिया (PICU)
३) मोठ्या मानसांचे संपूर्ण आजार व शस्त्रक्रिया (मेडिसिन ICU)
४) श्वासाचे आजार / मेंदुचे आजार व शस्त्रक्रिया.
५) किडनिचे आजार व मुतखड्याची शस्त्रक्रिया.
६) पोटाचे आजार व शस्त्रक्रिया तसेच दुर्बिनद्वारे शस्त्रक्रिया (Laproscopy)
७) अस्थिरोग विभाग व शस्त्रक्रिया
८) जळीत रूग्णांचे आजार व शस्त्रक्रीया. (Burn Unit)
९) ट्रॉमा व एक्सीडेंट सर्जरी व उपचार
१०) स्त्रिरोग व प्रसुतीरोग उपचार व शस्त्रक्रिया.
११) कान, नाक, घसा उपचार व शस्त्रक्रीया.
१२) दंतरोगाची सर्जरी व उपचार
१३) प्लास्टीक सर्जरी उपचार
१४) कॅन्सर उपचार, शस्त्रक्रिया व किमोथेरपी इत्यादीची सुविधा
योजनेसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे :- १) ओरिजनल राशनकार्ड किंवा २) कुटूंबातील सर्वांचे ओरिजनल आधार्ड कार्ड. ३) आयुष्यमान कार्ड
टिप :- इमर्जसिंमध्ये फक्त रूग्णांच्या आधार कार्डच्या झेरॉक्स वरती सुध्दा रूग्णाला उपचार दिला जाईल.


# एस.टी.कर्मचारी सचिन पिंगळे यांना विश्वकर्मा गुणवंत पुरस्कार मिळाल्याबद्दल ना.सरनाईक यांच्याहस्ते सत्कार

**बुलढाणा, ८ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : औद्योगिक क्षेत्रात अत्यंत महत्त्वाचा व प्रतिष्ठेचा मानला जाणारा महाराष्ट्र शासनाचा विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार २०२३ हा दिनांक १३ मे २०२५ रोजी महामहीम राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या शुभहस्ते बुलढाण्यातील एस.टी.महामंडळात विभागीय कार्यालय, रा.म.बुलढाणा येथे काम करणारे कर्मचारी सचिन लक्ष्मण पिंगळे यांना त्यांनी केलेले सामाजिक, कला, क्रीडा, साहित्यलेखन, संघटनात्मक केलेल्या कामाबद्दल कामगार भवन, प्रभादेवी, मुंबई येथे कामगार कल्याण मंडळ, मुंबई यांच्यावतीने दिला जाणारा महाराष्ट्र शासनाचा विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार हा १३ मे रोजी प्रशस्तीपत्र,सन्मानचिन्ह, सुवर्णपदक, धनादेश अशा स्वरूपाची बक्षीस देऊन त्यांना सहकुटुंब गौरविण्यात आले. सदर पुरस्काराची निवड प्रक्रियेबद्दल सचिन पिंगळे यांना विचारले असता त्यांनी सांगितले की एस.टी. महामंडळाच्या वतीने सन २०२२ व २३ असे दोन वेळा त्यांचा प्रस्ताव पाठवला होता. सदर पुरस्काराची एस.टी.महामंडळाने दखल घेऊन परिवहन मंत्री ना.प्रताप सरनाईक व एस.टी.महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी एस.टी.महामंडळाचा ७७ वा वर्धापन दिनानिमित्त १ जून २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण



नाट्यगृह, माटुंगा, मुंबई या ठिकाणी भव्यदिव्य, रंगारंग कार्यक्रमात एस.टी. महामंडळाचे सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे पाच अधिकारी व विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त पुरस्कारार्थी यांचा सत्कार परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या शुभहस्ते तसेच एस.टी. महामंडळाचे एम.डी.मा.माधव कुसेकर व सर्व अधिकारी कर्मचारी वृंद यांच्या साक्षीने त्यांचा सत्कार, शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला आहे. एवढ्या मोठा सत्कार समारंभ शासनाने व एस.टी.महामंडळाने केल्याबद्दल सचिन लक्ष्मण पिंगळे यांनी त्यांच्या घेतलेल्या मुलाखतीमध्ये शासनाची तसेच एस.टी.महामंडळाचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहे.

# कपाट फोडून अज्ञाताने दागिण्यांसह रोकड पळवली

**मोताळा, ८ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : तालुक्यातील दाभाडी येथे घरातील कपाट फोडून अज्ञात चोरट्याने रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा सुमारे ४१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना समोर आली आहे. आकाश मारोती डंबेलकर (रा. दाभाडी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ३ जून रोजी रात्री त्यांच्या वडिलांनी जेवणानंतर घराच्या गच्चीवर झोप घेतली होती. याच दरम्यान, अज्ञात चोरट्याने घरात शिरून कपाटातील १८,५०० रुपये रोख रक्कम




आणि ३ ग्रॅम सोन्याची पोत (अंदाजे किंमत २३,००० रुपये) असा ऐवज चोरून नेला. ही घटना ४ जून रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. याप्रकरणी ६ जून रोजी बोराखेडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पीएसआय मधुकर महाजन व वींद्र नरोटे करीत आहेत

8 June LAST PAGE_Layout 1 6/8/2025 5:57 PM Page 1



# जोक वाचणार त्याला गुड गुल्या

दिवाळीला ४००० च्या फटाक्यांचा ४ मिनीटांत धुर करुन.
४० लोकांचे जिवन धोक्यात घालण्यापेक्षा...
४ ग्लास दारू मित्रांच्या पोटात घाला.
मिळालेल्या ४ आशीर्वादामुळे ४ दिवस जास्त जगाल..
.
**-अखिल भारतीय बेवडी संघटना-**

-----------------

शाळेतील मुलांची सहल परत येते.
एका मुलाची आई वर्गशिक्षिके कडे तक्रार घेऊन जात,
माझ्या मुलाचा टर्कीश टॉवेल चोरीला गेला आहे.
माझी ही अपेक्षा नव्हती की माझ्या मुलाच्या बरोबर
असे चोर शिकत आहेत=!
वर्गशिक्षिका अजीजीने सांगतात,
अहो चुकून कुणाच्या कडे गेला असेल.
कोण कशाला चोरेल. मुले लहानच आहेत.
मी शोधून देते. कसा होता टॉवेल?
**मुलाची आई :** पांढऱ्या स्वच्छ रंगाचा, फुल साईझ टॉवेल होता.
त्यावर HOTEL HOLIDY IN असे लिहीलेलं पण आहे...

-------------------

लग्नात कुवारे आणी अंतयात्रेत म्हातारे
सर्वात जास्त का जातात..
कारण
दोघांना एकाच गोष्टींची चिंता असते
मी नाही जाणार तर माझ्या वेळी कोण येणार..

----------------------

एकदा देव माणसाला विचारतो ...
आता तू म्हातारा झाला आहेस आणि
तुझ्या नशिबात एक आजार आहे. तुला मी दोन पर्याय देतो ...
एक म्हणजे पार्किन्सन्स (ज्यात हात थरथर कापतात),
आणि दुसरा म्हणजे अल्झायमर (स्मृतिभ्रंश)
तू ठरव तुला काय हवंय ....
माणूस विनाविलंब उत्तर देतो....पार्किन्सन्स ...
बाटली कुठे ठेवली ते विसरण्यापेक्षा अर्धा ग्लास सांडलेला परवडला.

--------------------

आज एका पोलिस वाल्याने मला थांबवलं
कारण मि हेलमेट नाही घातल होत.
पोलिसा ने गाड़ीची चावी काढून घेतली.
आणि म्हटले,
ये माझ्या मागे-मागे...
आम्ही तर बुलडाण्याचे..मग काय ?

आम्ही खिशातुन दूसरी चावी काढली ,
गाड़ी स्टार्ट केली आणि म्हटलो,
आता तू ये
आमच्या मागे..

--------

श्रावण महिन्यात असा उपवास करुन दाखवा.
सोमवार मोबाईल बंद.
मंगळवार फेसबुक बंद.
बुधवार लाईट बंद.
गुरूवार इंटरनेट बंद.
शुक्रवार कार/ मोटरसायकल बंद.
शनिवार वॉटस् अॅप बंद.
रविवार टी.वी. बंद.
असे उपवास कराल तर..
साक्षात देव पृथ्वीवर येवून म्हणेल बस् कर वेड्या रडवशील काय?

----------

सुन रात्रभर उलट्या करत होती..!!
सकाळी बघितलं तर लोणचं चाटत होती..!!
सगळ्या घरामध्ये आनंदाची लहर पसरली..!!
सासूने डॉक्टरांना बोलावलं...!!
डॉक्टरांनी चेक केलं आणि एक इंजेक्शन दिलं,
आणि म्हणाले, थोड्या वेळात नॉर्मल होईल..!!
**सासू :** डॉक्टर, काय झालं..?
**डॉक्टर :** चिंता करायची गरज नाही...!!
**सासू :** हो पण इंजेक्शन कसलं दिलं तुम्ही..?
**डॉक्टर :** एंटी-अल्कोहोल इंजेक्शन दिलय...!!
**सासु :** म्हणजे
**डॉक्टर :** दारु लवकरच उतरेल....!!
ब्रँड चेंज झाला की थोडा प्रॉब्लेम होतोच..!!!
***गटारी* दुसर काय?**

--------------------

देवाने प्रत्येक माणसाला
वेगळं बनवलं आहे..
पण जेव्हा चिन ची वेळ आली
तेव्हा देव थकले होते.
आणि मग काय..
मार Copy Paste... Copy Paste....

--------------

बंडोपंत कामावरुन उदास चेहऱ्याने घरी आले..
बायको ने विचारले काय झाले, चहेरा असा का.
**बंडू :-** माझ्या कंपनीतले सर्व लोक वारले.
**बायको:-** आँ ...कशा मुळे ?
**बंडू :-** शॉर्टसर्किट झाले आणि सगळे शॉक बसुन ठार झाले.....
**बायको :-** मग तुम्ही कसे वाचला ?
**बंडू :-** मी नेमका त्या वेळेला मी गायछाप
मळायला बाहेर गेलो होतो.
**बायको :-** मग आता...?
**बंडु :-** आता कंपनी सर्व वारसदारांना पंचवीस लाख रुपये नुकसान भरपाई देणार आहे...
**बायको :-** (कपाळावर हात मारुन)
बाई....बाई..विश्वासच नाही बसत की,
केवळ तुमच्या गायछापमुळे माझे पंचवीस लाखाचे नुकसान झाले.. तरी तुम्हाला हजार वेळा सांगितलय की
ती गायछाप सोडा म्हणुन....काय म्हणावं ह्या कर्माला

------------------

**अमरेंद्र बाहुबली :-** मेरा वचन ही मेरा शासन !!
**नरेंद्र बाहुबली :-** मेरा भाषण ही मेरा शासन !!
**देवेंद्र बाहुबली :-** अभ्यास करत आहे महाराष्ट्र शासन !!

---------------

रोजच आपल्या आहारात मद्याचा वापर करावा.
त्यामुळे खोकल्याचा जोर कमी होतो.
मद्याचा वापर फक्त काही शारीरिक व्याधी असल्यावरच
घ्यावा असे काही नाही.
निरोगी व्यक्तींनीही आरोग्य संपन्नतेसाठी मद्य
घ्यायला हरकत नाही.
रोज सकाळी पेलाभर थंड पाण्यात
दोन टी स्पून मद्य घालून प्यावे.
यामूळे पोटाचे विकार बरे होतात.
मराठी टायपिंग लई आवघड आहे बुवा.
कृपया 'मद्य' ऐवजी 'मध' असे वाचावे..
लगेच काहीजण खुश झाले.

--------------------

सिन्धी : जब तुम्हें गर्मी लगती है तो तुम क्या करते हो?
.
मारवाड़ी : हम कूलर के सामने बैठ जाते हैं।
.
सिन्धी : फ़िर भी अगर गर्मी लगे तो क्या करते हो?
.
मारवाड़ी : फ़िर हम कूलर चालू करते हैं.

--------------

# अल्पवयीन पुतणीला पळवणारा काका अटक

**बुलढाणा, ७ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : आपल्या अल्पवयीन पुतणीला प्रेमजाळ्यात फसवून भुर्र होणाऱ्या काकाच्या अखेर पोलिसांनी मुसक्या आवळल्या. आरोपीस न्यायालय हजर केले असता न्यायालयाने त्याची रवानगी बुलढाणा मध्यवर्ती कारागृहात केली आहे. ऐतिहासिक महत्त्व लाभलेल्या आणि बुलढाणा तालुक्याच्या राजकीय पटलावर आपले स्थान निर्माण केलेल्या एका गावातून नात्यांच्या पवित्रतेला काळिमा फासणारी एक धक्कादायक घटना समोर आली होती. गावात राहणाऱ्या आणि नात्याने काका असलेल्या प्रेमविराने आपल्याच अल्पवयीन पुतणीला घेऊन पलायन केले होते. या घटनेमुळे परिसरातच नव्हेतर संपूर्ण तालुक्यात एकच खळबळ उडाली होती. रक्ताच्या नात्याची मर्यादा ओलांडणाऱ्या या घटनेमुळे समाजात तीव्र प्रतिक्रिया उमटत होत्या. या प्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी करण्यात आली असून, पोलिसांनी झटपट सूत्रे हलवित पीडितेला शोध घेऊन तिला सुखरूप परत आणले. तर आरोपी काका फरार झाला होता. आरोपीला बुलढाणा येथील न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली आहे. तर पीडितेला कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास ठाणेदार आशिष चेचरे यांच्या मार्गदर्शनात धाड पोलीस करीत आहेत

# खामगाव कॉँग्रेस तालुकाध्यक्षपदी तेजेंद्रसिंग चव्हाण तर शहराध्यक्षपदी स्वप्निल ठाकरे

**खामगाव, ८ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : कॉँग्रेसच्या तालुका अध्यक्षपदी तेजेंद्रसिंग किशोरसिंग चौहान यांची तर शहराध्यक्षपदी स्वप्निल संजय ठाकरे यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. कॉँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशावरून ५ जून रोजी त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहे. पत्रामध्ये त्यांनी आपण आपल्या भागातील कॉँग्रेस पक्ष बळकट करण्यासाठी जोमाने प्रयत्न करावे असे नियुक्ती पत्रात नमूद केले आहे. कॉँग्रेसचे माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांनी नुकतीच कॉँग्रेसला सोडचिट्ठी दिली. तर त्यांच्या पाठोपाठ शहराध्यक्ष सरस्वती खासणे व तालुकाध्यक्ष मनोज वानखडे यांनीही कॉँग्रेस सदस्य पदाचा राजीनामा दिला आहे. प्रदेश कॉँग्रेसने विधानसभा मतदारसंघावर तत्काळ लक्ष दिले विधानसभा समन्वयक पदी ज्ञानेश्वर पाटील माजी





आमदार दिलीप कुमार सानंदा यांनी राजीनामा दिल्यानंतर मतदार संघाच्या समन्वयक पदी ज्ञानेश्वर पाटील यांची नियुक्ती प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशाने करण्यात आली आहे. सानंदा यांनी कॉँग्रेस सोडल्यानंतर विधानसभा मतदार संघातील कॉँग्रेस कार्यकर्त्यांना जोडून ठेवण्याचे आव्हान ज्ञानेश्वर पाटील यांच्यासमोर आहे. आहे. प्रदेश कॉँग्रेसने तडकाफडकी निर्णय घेत तालुका अध्यक्षपदी तेजेंद्रसिंग चौहान तर शहराध्यक्षपदी स्वप्निल ठाकरे या नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे. नियुक्ती पत्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष अॅड. गणेश पाटील यांच्या सहीनिशी देण्यात आले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पार्श्वभुमीवर या निवडीला मोठे महत्व प्राप्त झाले आहे. माजी आमदार दिलीप कुमार सानंदा पक्षात नसतांना ही निवडणूक त्यांना लढणे आहे.

# रानडुकराचा ७ व्यक्तींवर हल्ला ; ३ गंभीर जखमी

**संग्रामपूर, ८ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : तालुक्यातील पातुर्डा गावात जखमी अवस्थेत सैरावैरा पळू लागलेल्या रानडुकराने ५ व्यक्तिवर हल्ला केल्याची घटना ७ जून रोजी सकाळी १० ते ११ वाजता दरम्यान घडली.



यावेळी गंभीर ३ जखमींना अकोल्यास उपचारार्थ भरती करण्यात आले आहे.

पातुर्डा गावातील कन्या शाळेच्यामागील नाल्यातून जखमी अवस्थेत असलेले रानडुकर थेट काझीपुऱ्यात घुसले. दरम्यान, अनवर खा याची दुचाकीला धडक देऊन नुकसान केले व त्याच्या मुलाला रस्त्याच्या कडेला धडक मारुन फेकुन दिले. त्यानंतर किराणा दुकानवर साहित्य खरेदीसाठी जाणाऱ्या १० वर्षीय शेख बीकलेन शेख राजु पादचारीस धडक देत चावा घेतला. यावेळी परिसरातील नागरिकांनी एकत्र येत आरडा ओरड केल्याने रानडुकर वार्ड नं १ मधील घरासमोर कपडे वाळू घालणाऱ्या सुमन पुंडलीक बोंबटकार (वय ८८) यांच्यावर अचानक हल्ला करून जखमी केले. त्यानंतर सुभाष झाडोकार यांच्यावर हल्ला केला त्यांच्या मांडी व पायाला गंभीर दुखापत केली. तसेच अंकित केळकर याच्या मांडीवर हल्ला केला तर टाकळी पंच येथील अतुल वानखडे यांच्या माडीवर हल्ला करुन वाननदी पात्राच्या कडेला नाल्याकडे धुम ठोकली. दरम्यान, सर्व जखमीवर आठवडी बाजारस्थित डॉ. चोखंडे यांच्या दवाखान्यात प्राथमिक उपचार केल्यानंतर ३ रुग्णांना रूग्णवाहिकेतून शेगावसाठी हलविले. तर ३ गंभीर जखमींना नातेवाईकांनी शेगाव येथे प्राथमिक उपचार केल्यानंतर अकोला येथे उपचारार्थ दाखल केले. त्यात १२ वर्षीय बालक शेख बीकलेन, सुभाष झाडोकार, सुमन बोंबटकार यांचा समावेश आहे. तिघांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती त्यांच्या नातेवाईकांनी दिली. दरम्यान, रान डुकराच्या हल्लूयात जखमी झालेल्या व्यक्तीचा आढावा घेत प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहिती वरुन वनविभाग जळगाव जामोद कार्यालयाचे वनरक्षक जी. एस. साखळे, वनपाल एस.एस.सावळे फॉरेस्ट गार्ड वाय.जी. गावंडे, वनमजुर सोपान बोंबटकार यांनी वाननदी पात्रातील नाल्या खोऱ्यात तसेच परिसरातील शेतात रेस्कू ऑपरेशन राबविले. मात्र, रान डुक्कर मिळून आले नाही. दरम्यान वनरक्षक साखळे यांनी वनकर्मचाऱ्यांसह रान डुकराच्या हल्लूयात जखमी झालेल्यांच्या घरी भेट देऊन वनविभागाकडून जखमींना आर्थिक मदत मिळण्यासंदर्भात मार्गदर्शन करून जखमींच्या नातेवाईकांना ऑनलाइन अर्ज करण्याच्या सूचना दिल्या.

# मोताळा तालुका कॉँग्रेस अध्यक्षपदी कदम



**मोताळा, ८ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : कॉँग्रेसच्या मोताळा तालुका अध्यक्षपदी प्रवीण अर्जुन कदम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते सध्या सिंदखेडचे सरपंच असून, त्यांनी गावात विविध विकासात्मक उपक्रम राबवून सिंदखेडचा कायापालट केला आहे. वृक्ष संवर्धन, जलसंधारण आणि पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल राज्यभर घेतली गेली आहे. त्यांच्या या कामगिरीच्या पार्श्वभूमीवर प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या निर्देशानुसार जिल्हा कॉँग्रेस कमिटीने त्यांची निवड केली आहे. कदम यांची ओळख एक उत्कृष्ट संघटक म्हणून असून, पक्षाने युवा नेतृत्वाला संधी दिली आहे. हर्षवर्धन सपकाळ यांच्या विश्वासू सहकारी म्हणून आप्पा कदम यांची ओळख आहे.




सायंदैनिक गुड इव्हिनिंग City हे पत्रक प्रकाशक, मालक रणजीतसिंग राजपूत 9850377344 यांनी कल्पक प्रिंटर्स, सराफा लाईन, बुलडाणा येथे छापून गुड इव्हिनिंग सिटी कार्यालय, गाळा क्र.२, पत्रकार भवन , बुलडाणा येथे प्रसिध्द केले. *कायदेशीर बाबी उद्भवल्यास बुलडाणा न्यायालयाअंतर्गत. फोन नं. (07262) 241026 संपादक : हरिदास उंबरकर 9763469184. RNI Reg.No.MAHMAR/2012/46689